पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University

सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)

Solapur-Pune National Highway. Kegaon. Solapur-413 255 (Maharashtra)

☏ ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००

ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०




◉ परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation ◉

जा.क्र.पुअहोसोविसो/प.व मू.मं./फोटोकॉपी विभाग/२०२५/ 249 दिनांक: 10 FEB 2025

## परिपत्रक

**संदर्भ: पुअहोसोविसो/प. व मू. मं./फोटोकॉपी विभाग/२०२४/५४, दि.११/०१/२०२४ रोजीचे परिपत्रक क्र.०२**

विद्यापीठाशी संलग्नित असणा-या सर्व महाविद्यालयाच्या/संस्थेच्या प्राचार्य/संचालक तसेच प्रस्तुत विद्यापीठातील विविध संकुलाचे संचालक यांना कळविण्यात येते की, ऑक्टो/नोव्हें-२०२३ च्या सत्रापासून बी.ए., बी.कॉम, बी.एस्सी. बी.बी.ए. व बी.सी.ए. या पाच अभ्यासक्रमातील प्रथम वर्षातील सर्व विषयांच्या परीक्षा महाविद्यालयस्तरावर घेण्यात येत असल्याने सदरच्या अभ्यासक्रमातील सर्व विषयांच्या परीक्षेकरीता विद्यार्थ्यांना द्याव्या लागणार उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत (Photocopy) आणि त्यानंतर होत असलेल्या उत्तरपत्रिकांच्या पूनर्मूल्यांकन (Revaluation) चे काम महाविद्यालयस्तरावर करण्याबाबत वरील संदर्भिय परिपत्रकान्वये कळविण्यात आलेले आहे. त्याच प्रमाणे **"ऑक्टो/नोव्हें-२०२४"** या सत्रात ही सदर कामकाज महाविद्यालयस्तरावर करण्याबाबत सूचित करण्यात येत आहे.

**"ऑक्टो/नोव्हें-२०२४"** च्या सत्रात वरील पाच अभ्यासक्रमातील प्रथम वर्ष वगळता, उर्वरीत सर्व अभ्यासक्रमातील विषयांच्या फोटोकॉपीची छायांकित प्रत (Photocopy) विद्यापीठामार्फत संबंधित विद्यार्थ्यांच्या लॉगिनमध्ये उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्याकरीता विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने विद्यापीठाकडे विहीत वेळेत अर्ज करणे बंधनकारक आहे.

सदर कामी विद्यार्थ्यांचा पीआरएन नंबर (PRN) हा त्यांचा युजरनेम असून पासवर्ड हा Student@PRN नंबरचे शेवटचे चार अंक असेल. सदर बाब सर्व पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

(उदा. User Name - PRN No. 123456789 and Password - Student@6789 PRN चे शेवटचे चार अंक)

१. Ordinance O.106(B) 2015 अन्वये वरील अभ्यासक्रमातील विषयाचा निकाल लागल्यापासून १५ दिवसापर्यंत विद्यार्थ्यांकडून पारंपारिक अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांने प्रति उत्तरपत्रिका शुल्क रु.२००/- आणि व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रति उत्तरपत्रिका शुल्क रु.३००/- ऑनलाईन पध्दतीने विद्यार्थ्यांने अर्जासोबत जमा करणे आवश्यक आहे. नियमानुसार **प्रति सत्र केवळ दोन विषयांच्या** उत्तरपत्रिकांच्या फोटोकॉपीसाठीच विद्यार्थ्यांना अर्ज करता येईल.

२. वरील अभ्यासक्रमातील द्वितीय व तृतीय वर्षातील ज्या विषयांची फोटोकॉपी विद्यापीठाकडून देण्यात आलेली आहे. त्याच विषयांच्या उत्तरपत्रिकेचे पूनर्मूल्यांकन करावयाचे झाल्यास विद्यार्थ्यांने ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक आहे.

सर्व अभ्यासक्रमातील विषयांच्या फोटोकॉपीचे पूनर्मूल्यांकन करण्याकरीता प्रति विषय रु.५००/- शुल्कासह फोटोकॉपी मिळाल्यापासून ७ दिवसापर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक राहील.

३. वरील अभ्यासक्रमातील **"फक्त प्रथम वर्षातील"** विषयांचे पूनर्मूल्यांकन महाविद्यालयस्तरावर झाल्यानंतर सदर विद्यार्थ्यांचे गुण सिलबंद लखोटयामध्ये भरुन मा.प्राचार्यामार्फत परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभागाकडे जमा करावेत.

४. उपरोक्त माहिती सादर करताना खालील तक्त्यामध्येच सादर करावी.

| Sr. No. | Course | Branch | Seat No. | PRN No. | Subject | Subject Code | Max Marks | Min. Marks | Obt. Marks | Reval Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

५. ऑनलाईन पध्दतीने फोटोकॉपी व पूनर्मूल्यांकनासाठी अर्ज करण्यासाठी https://pahsusis.studentscenter.in या लिंकचा वापर करावा.

क्र.भा.प.

६. विद्यार्थ्यांच्या सोईसाठी विद्यार्थ्यांना दिलेल्या लिंकवर/त्यांच्या लॉगिन आयडीमध्ये फोटोकॉपी व पूनर्मूल्यांकनाचा अर्ज कसा करावा याबाबतचा डेमो-व्हिडिओ उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

७. वरीलप्रमाणेच OSM अभ्यासक्रमाच्या (सर्व पदव्युत्तर (PG) अभ्यासक्रम व बी.ए.एल.एल.बी., एल.एल.बी., बी.टेक., बी.आर्किटेक्चर, बी.फार्मसी, बी.एड. बी.पी.एड.) फोटोकॉपी व पूनर्मूल्यांकनासाठी कार्य पध्दती वापरावी.

(टिप: ज्या परीक्षांचे निकाल सद्यस्थितीत विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द/जाहीर करण्यात आलेले आहेत, अशा विद्यार्थ्यांना सदरचे परिपत्रक निर्गमित झाल्यापासून फोटोकॉपीसाठी १५ दिवसाची मुदत राहील)

(डॉ.श्रीकांत ग. अंधारे)
संचालक, प. व मू. मं.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
✆: ०२१७-२७४४७७०,७६,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०
◉ परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation ◉

जा.क्र.पुअहोसोविसो/प.व मू.मं./फोटोकॉपी विभाग/२०२४/ 54

दिनांक : 11/01/2024

**परिपत्रक** -02

विद्यापीठाशी संलग्नित असणा-या सर्व महाविद्यालयाच्या प्राचार्य/संचालक यांना कळविण्यात येते की, ऑक्टो/नोव्हें-२०२३ च्या सत्रापासून बी.ए., बी.कॉम, बी.एस्सी., बी.बी.ए. व बी.सी.ए. या पाच अभ्यासक्रमातील प्रथम वर्षातील सर्व विषयांच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर घेण्यात येत असल्याने सदरच्या अभ्यासक्रमातील सर्व विषयांच्या परीक्षेकरीता विद्यार्थ्यांना द्याव्या लागणार उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत (Photocopy) आणि त्यानंतर होत असलेल्या उत्तरपत्रिकांच्या पूनर्मूल्यांकन (Revaluation) चे काम महाविद्यालयस्तरावर करण्याबाबत यापूर्वी कळविण्यात आलेले आहे.

बी.ए., बी.कॉम, बी.एस्सी., बी.बी.ए. व बी.सी.ए. या पाच अभ्यासक्रमातील द्वितीय व तृतीय वर्षातील सर्व विषयांच्या उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत (Photocopy) विद्यापीठामार्फत विद्यार्थ्यांच्या ईमेल-आयडीवर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्याकरीता विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामार्फत खालीलप्रमाणे विद्यापीठाकडे विहीत वेळेत अर्ज करणे बंधनकारक आहे.

१. Ordinance O.106(B) 2015 अन्वये वरील अभ्यासक्रमातील विषयाचा निकाल लागल्यापासून १५ दिवसापर्यंत विद्यार्थीकडून फोटोकॉपीसाठीचे शुल्क रु.२००/- (प्रती विषय) आकारुन पुढील तीन दिवसात विद्यापीठाकडे एकुण शुल्कासहं जमा करावेत. नियमानुसार **प्रती सत्र केवळ दोन विषयांच्या** उत्तरपत्रिकांचे फोटोकॉपी विद्यार्थ्यास उपलब्ध करुन देण्यात येईल.

२. सदर विषयांचे उत्तरपत्रिकाची/फोटोकॉपीचे पूनर्मूल्यांकन करावयाचे असल्यास सदर विद्यापीठाकडुन रु.५००/- शुल्क आकारुन एकुण (उत्तरपत्रिकाची/फोटोकॉपी मिळाल्यानंतर ७ दिवस पर्यंत) शूल्कासह विद्यापीठासह जमा करावेत.

३. उपरोक्त प्रमाणे फोटोकॉपी/पुनर्मल्यांकनाचे अर्ज महाविद्यामार्फतच घेण्यात येणार आहे. कोणत्याही परिस्थतीत विद्यार्थ्यांना या विभागाकडे पाठवू नये.

**टिप :** ज्या सेम -५ च्या फोटोकॉपीची मुदत दि : ११/०१/२०२४ पुर्वी संपलेली आहे त्यांना दि : १७/०१/२०२४ पर्यंत अंतिम मुदत विद्यार्थ्यांसाठी देण्यात येत आहे. तरी विद्यार्थ्यांचे फोटोकॉपीचे अर्ज महाविद्यालयानी दि : १९/०१/२४ पर्यंत विद्यापीठाकडे सादर करावेत.

(डॉ.एम.एस.रोकडे)
**प्र-संचालक**